




बालविकास मूल्यमापन प्रात्यक्षिक



अन्न विज्ञान व पोषण प्रयोगशाळा



प्राचार्यासमवेत विद्यार्थी



वस्त्र व परिधान अभिकल्पना विभाग प्रात्यक्षिक



## Our Alumni – Our Pride

- Dr. Manjusha Boralkar, HOD, Govt. College of Arts and Science, Aurangabad.
- Dr. Jayshree Zend, Associate Dean & Principal, College of Community Science, VNMKV, Parbhani.
- Dr. Savita Shete, Principal, Mahila College for arts and Science, Beed (MS)
- Dr. Jaya Bangale, Dr. Nahid Khan, Dr. Madhuri Kulkarni, Prof. Medha Umrikar, Prof. Nita Gaikwad, Dr. Veena Bhalerao, Dr. Farzana Farooqui, Dr. Irfana Siddiqui and Dr. Jaya Rodge are working as Professor/Asso. Professor / Asstt. Professor in College of Community Science, VNMKV, Parbhani.
- Ms. Jaya Ranjini, Asstt. Director, NIPCCD, Rigional Center, Banglore.
- Ms. Sneha Deo, BDO, NREGA, ZP, Pune.
- Ms. Medha Khedkar, Director & Interior Designer, Creative Minds, Pune.
- Ms. Soniya Parekh, Entrepreneur, retail outlets as Franchisee for Titan brands- Tanishq and Eyeplus
- Ms. Kalpana Anantwar, Practitioner, Lewisham and Green Uni. Hospital, London, UK.
- Mr. Pradeep Rake, National Head for consultancy Services, International Institute of Planning and Management, Pune.
- Dr. Rajesh Kamble, Dr. Varsha Zanwar, Dr. Surekha Gaikwad, Vandana Rodge, Jayshree Nagure, Shailaja Nalawade, Surekha Sarkate, Smita Saundadkar, Sangita Kamble, Prachi Giri, Amita Kamble, Deepali Dhawne, Shivshakti Godselwar and others are working as professor/Asstt. Professor in various colleges.
- Dr. Chaya Bhise, HOD, SRMP College of H.Sc., Akluj (MS).
- Dr. Seema Medhe, Nutralife, Nutritional counselor, Thailand.
- Ms. Varsha Nandedkar: Business owner at Quest IIT Academy, Pune.
- Ms. Shayama Kulkarni, Asstt. Divisional Manager, LIC, Pune,
- Ms. Smita Lahorkar, HR Recruitment Consultant, Greenfield Mgt and Placement Pvt. Ltd., Pune.
- Ms. Archana Sakhare, Principal in D.EL.ED. College, Surat.
- Ms. Kanchan Borikar, Principal in Adani Vidya Mandir, Ahmedabad, a reputed CBSE school.
- Dr. Megha Bagul- Director, Kids Hub, Child Day care and Development Center, Parbhani.
- Dr. Anuradha Dubey, Vice Principal, Women's College of Home Science & BCA, Loni.
- Prof. Priyanka Swami, NET Qualified, Assistant Professor, Trimurti Pawan Pratishthan Newasa.
- Ms. Smita Kulkarni, Chief Administrative Officer, D.of Health Services, Govt. of Maharashtra, Pune.
- Ms. Dipti Patgaonkar, Varsha Marwalikar, Madhuri Revanwar, Dr. Sadhana Umrikar, Sangita Gaikwad, Vaishali Deshmukh, Aruna Kharwade, Rohini Joshi, Anjali Gunjal are working as Subject Matter Specialist (Home Science) in various KVKs, Maharashtra.
- Ms. Sneha Koli/ Kapse Owner and founder, –Design Principal, Pune.
- Ms. Shubhangi Kamble, Educational Counsellor and PGT CBSC School, Pune
- Mr. Eknath Lokhande, Principal, Rajmata J English School, Aurangabad.
- Ms. Parvati Shide, Cashire, Dena Bank, Niphad.
- Ms. Manisha Nirmal, Deepak Pagare, Pravin Kamble, Kavita Ghodke, Sanjivani Shinde, Smita Dakh and many others are working as Dietitian in Govt./Private hospitals.
- Dr. Chitra Belurkar, Manjusha Revanwar, Jyotsna Nerlekar, Sangita Naik, Rupali Shinde, Manisha Karhale, Dhanashree Chavan and many others are working in research projects.

Besides these alumni, many are successful entrepreneurs and are also working as consultants, counsellllors, teachers etc. However due to having limited space, unable to mention many alumni working successfully in various domains.


संपर्क
डॉ. जयश्री झेंड
सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य
सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी
दूरध्वनी : (०२४५२) २३३२६०

लेखिका
डॉ. जया बंगाळे
मानव विकास व कौटुंबिक अभ्यास विभाग प्रमुख
सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वनामकृवि, परभणी
भ्र.ध्व.क्र. ७५८८०८२०५६


"महाराष्ट्रातील एकमेव अभ्यासक्रम"

# सामुदायिक विज्ञान

## यशस्वी करिअरसाठी शाश्वत अभ्यासक्रम




## सामुदायिक विज्ञान महाविद्यालय

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

परभणी ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

२०२०–२१

प्रकाशन क्रमांक : व.ना.म.कृ.वि.शि.सं.प्र.क्र.०३/२०२१

# सामुदायिक विज्ञान
## यशस्वी करिअरसाठी शाश्वत अभ्यासक्रम

संपुर्ण महाराष्ट्रात केवळ वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे सामुदायिक विज्ञान हा नावीन्यपूर्ण व्यावसायिक अभ्यासक्रम राबवला जातो. सन २०१७ पासून पूर्वीच्या गृहविज्ञान अभ्यासक्रमाचा कायापालट करून तो आता सामुदायिक विज्ञान (Community Science) या नावाने संबोधल्या जात आहे. यापूर्वी हा अभ्यासक्रम केवळ मुलींकरीता गृहीत धरला जात असला तरी नोकरी-व्यवसायाच्या मुबलक संधी लक्षात घेऊन आता मुलेही या अभ्याक्रमाकडे आकर्षित होत आहेत. महाराष्ट्रात असणाऱ्या चार कृषि विद्यापीठांपैकी केवळ वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात सामुदायिक विज्ञान महाविद्यालयात (कॉलेज ऑफ कॉम्युनिटी सायन्स) हा अभ्यासक्रम राबविला जातो. अभियांत्रिकी तथा वैद्यकीय अभ्यासक्रमासारखा 'सामुदायिक विज्ञान' हा देखील व्यावसायिक अभ्यासक्रम असल्याने तो पूर्ण करण्यासाठी ४ वर्षाचा कालावधी लागतो. हा पदवीपूर्व अभ्याक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना बी.एस्सी (ऑनर्स) कम्युनिटी सायन्स ही पदवी बहाल करण्यात येते. कोणत्याही सामान्य पदवीपेक्षा ऑनर्स पदवीला विशेष महत्त्व असते. कारण ऑनर्स पदवी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयांशी निगडीत प्रत्यक्ष अनुभव देण्यावर अधिक भर असतो. त्यामुळे असे विद्यार्थी स्वत:च्या नोकरी-व्यवसायात अधिक यशस्वी होतात.

### सामुदायिक विज्ञान अभ्यासक्रमातील प्रमुख विषय

- **मानव विकास व कौटुंबिक अभ्यास** (Human Development & Family Studies)
- **अन्न विज्ञान आणि पोषण** (Food Science & Nutrition)
- **साधन संपत्ती व्यवस्थापन आणि ग्राहक विज्ञान** (Resource Management & Customer Science)
- **वस्त्र व परिधान अभिकल्पना** (Textile & Apparel Designing)
- **सामुदायिक विस्तार व संदेशवहन** (Community Extension and Communication Management)

**दर्जेदार करिअरच्या अनेक संधी उपलब्ध**

### सामुदायिक विज्ञान अद्ययावत अभ्यासक्रम

उपरोक्त प्रमुख विषयातंर्गत पदवीपूर्व अभ्यासक्रमात एकूण ५२ विषय हे ८ सत्रांमध्ये पूर्ण केले जातात. सध्याच्या स्पर्धात्मक युगात टिकाव लागण्यासाठी हे सर्व विषय विद्यार्थ्यांकरिता अतिशय उपयुक्त आहेत. पदवी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर सुरुवातीच्या ३ वर्षांत त्यांना या अभ्यासक्रमातील प्रत्येक विभागांच्या प्रमुख विषयांचे अध्ययन करावे लागते. तद्नंतर पदवी शिक्षणातील चतुर्थ वर्षात त्यांना त्यांच्या विषयासंबंधीच्या प्रक्षेत्रावरील प्रत्यक्ष अनुभव येण्यासाठी नामांकीत संस्थांमध्ये इम्लांट ट्रेनिंग, ग्रामीण विभागातील कार्याच्या अनुभवासाठी रावे (आरएडब्ल्युई- रुरल एरीया वर्क एक्सपिरियन्स) तथा स्टुडन्टस् रेडी प्रोग्राम (इएलपी-इक्सपिरियंशिल लर्निंग प्रोग्राम) असे अद्ययावत उपक्रम राबवले जातात. तद्वतच या अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र तथा भारतातील विविध संस्थांना भेटी देण्यासाठी शैक्षणिक सहलींचे आयोजन केले जाते. तसेच सध्याच्या आधुनिक युगातील विविध आव्हाने पेलण्याकरीता विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी त्यांची संवाद कौशल्ये तथा व्यक्तिमत्व विकास या विषयांवर भर दिला जातो. याबरोबरच शारीरिक शिक्षण, योगाभ्यास, सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय सेवा योजना यासारख्या विधायक कार्यातही विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जाते.

### सामुदायिक विज्ञान अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया

भारतातील विविध राज्यांमध्ये कृषि विद्यापीठांशी संलग्नित असणाऱ्या सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणेच हा अभ्यासक्रम असून यामुळे विद्यार्थ्यांना नोकरी-व्यवसायाच्या वाटा खुल्या झालेल्या आहेत. सामुदायिक विज्ञान या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी इ.१२ विज्ञान, किंवा तत्सम परीक्षा तथा सक्षम प्राधिकाऱ्याकडून आयोजित करण्यात आलेली एमएचटी-सीईटी, जेईई/नीट, एआयइइए-युजी सामायिक प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक असून या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंबंधीची सविस्तर माहिती महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येते या अभ्यासक्रमाकरीता मुला-मुलींसाठी प्रवेश खुला आहे. तसेच मुलींनी सक्षम होण्याकरीता महाराष्ट्र शासनाने विद्यार्थीनींचे शैक्षणिक शुल्क माफ केले आहे. याबरोबरच शासनाने जाहीर केलेल्या शिष्यवृत्तींचा लाभ पात्र विद्यार्थ्यांना दिला जातो.

### सामुदायिक विज्ञान महाविद्यालयातील सुविधा

विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी या महाविद्यालयात अद्ययावत प्रयोगशाळा व वर्ग, उच्च विद्या विभुषित व अनुभवी प्राध्यापक वृंद, कॉऊन्सलींग व प्लेसमेंट सेल, संगणक प्रयोगशाळा, इंटरनेट, अद्ययावत वसतीगृह, खेळाचे मैदान अशा सर्व सुविधांसह अतिशय रम्य परिसरात हे महाविद्यालय वसलेले आहे.

### सामुदायिक विज्ञान पदवीधरांसाठी करिअरच्या संधी

सामुदायिक विज्ञान या विषयातील पदवीपूर्व तथा पदव्यूत्तर शिक्षण यशस्वीपणे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना नोकरी व्यवसायाचे अनेक मार्ग खुले केले असून विशेषत: दवाखाने व व्यायामशाळेत आहारतज्ज्ञ, बालविकास अधिकारी, कॉउन्सलर, प्राध्यापक, शिक्षक, पर्यवेक्षक, प्रशिक्षक, इंटेरीयर डिझायनर, हॅन्डीक्राफ्ट मेकर्स, इव्हेन्ट मॅनेजर, फॅशन डिझायनर, बुटीक मॅनेजर, विस्तार अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, शास्त्रज्ञ महिला व बालविकास योजनेच्या विविध पदांवर तथा खाजगी, निमशासकीय, शासकीय स्तरावरील विविध योजना व संस्थांमध्ये कार्य करण्याच्या मुबलक संधी उपलब्ध आहेत. याबरोबरच



या विद्यार्थ्यांना स्वत:च्या दर्जेदार पूर्व प्राथमिक शाळा, पाळणाघरे सुरु करणे, आहार सल्ला केंद्र, कौटूंबिक मार्गदर्शन केंद्र व समुपदेशन केंद्र, बेकरी व कन्फेक्शनरी युनिट कॅन्टीन स्थापित करण्यासाठीही सक्षम केले जाते. तसेच सध्या एमबीए अभ्यासक्रमाला आलेले महत्त्व पाहता हे पदवीधर एमबीएसाठीही पात्र असतात. महाविद्यालयातून पदवीपूर्व अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी इतर स्पर्धा परीक्षांसाठी देखील पात्र असल्याने त्याद्वारेही ते यश प्राप्त करू शकतात. येथील पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांच्या आवडीच्या विषयात जसे की डायटेशियन, स्पेशल एज्युकेटर, स्पीच थेरपी, बाल व कौटुंबिक समूपदेशन, इंटेरियर डिझायनिंग, फॅशन डिझायनिंग इ. डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरच्या कक्षा रूंदावता येतात. याबरोबरच अन्न प्रक्रिया व साठवणूक, हेल्थक्लब, लॅन्डस्केप प्लॅनिंग, फर्निचर इरगो डिझायनिंग, निवासस्थाने व्यावसायिक संस्था दवाखाने मॉल्स आदींसाठी गार्डन डिझानिंग, पुष्प रचना, पुष्पगुच्छ निर्माण, गिफ्ट पॅकेजिंग, इको टुरिझम, शैक्षणिक साहित्य व खेळणी निर्माण हाऊस किपिंग यासारख्या अनेक अभिनव क्षेत्रात व्यवसाय करण्यासाठीही विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये विकसित केली जातात.

### स्वायत्त संस्था व आंतरराष्ट्रीय एजन्सीमधील संधी

किशोर न्यायालय (JJB), केंद्रीय समाज कल्याण मंडळ, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT) राष्ट्रीय सहकार्य आणि बालविकास संस्था (NIPCCD) यासारख्या संस्थांमध्येही नौकरी करण्याच्या संधी उपलब्ध आहेत. तसेच युनिसेफ, युएनडीपी, युएसएडी, एफएओ, डब्ल्युएचओ, यासारख्या संस्थांमध्ये कार्य करण्याच्या वाटा खुल्या आहेत. भारतातील ज्येष्ठ नागरिकांची संख्या झपाट्याने वाढत असून कुटुंबाला त्यांच्या काळजी विषयक समस्यांनाही तोंड द्यावे लागणार आहे. तेव्हा समाजाची ही गरज ओळखून त्यांच्यासाठीही डे केअर होम, त्यांच्या स्वत:च्या घरीच त्यांना द्यावयाच्या काळजीविशयक सेवा तद्वतच ज्या कुटुंबात दिव्यांग बालके व्यक्ती आहेत त्यांच्यासाठी विशेष सेवा, इंटरव्हेंशन कार्यक्रम यासारख्या आव्हानात्मक क्षेत्रात कार्य करण्यासही विद्यार्थ्यांना तयार केले जाते. विद्यार्थ्यांना सामुदायिक विज्ञान या अभ्यासक्रमाचा लाभ त्यांच्या नोकरी-व्यवसायाकरीता तर होतोच या व्यतिरिक्त त्यांचे वैयक्तिक जीवनही आनंदी व यशस्वीपणे व्यतीत करण्यासाठी या अभ्यासक्रमास अनन्यसाधारण महत्व आहे हे निश्चित! तेव्हा सामुदायिक विज्ञान या अभ्यासक्रमाची व्याप्ती लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा.